वर्ष : १४०

Regd.No. PCW/002/2018-2020-S.P.College Post-RNI No. 1755/57

केसरी

राष्ट्रीय ठेवा

• अंक २०१ • पृष्ठे : १२ • पाच रुपये • बुधवार २९ जुलै २०२०, पुणे C (पुणे/अहमदनगर/सोलापूर आवृत्ती)

# फिनोलेक्स इंडस्ट्रीज, मुकुल माधव फाउंडेशनचे योगदान



**पुणे** : फिनोलक्स इंडस्ट्रीज, मुकुंद माधव फाऊंडेशनद्वारे समाजातील बाधित, असुरक्षित गट तसेच आघाडीवरील योद्ध्यांकरिता साहाय्य प्रदान केले आहे. रोजंदारावरील मजूर, परप्रांतीय कामगार, सुमारे एक लाख लोकांना पूर्ण वेळ भोजन तसेच १३,००० परप्रांतीयांना प्रवास योजना, पादत्राणे इ.सेवा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. राजस्थानातील संगीत कलाकार, तृतीयपंथी समाजातील पीडित व्यक्ती, एचआयव्ही बाधित यांनाही आर्थिक साहाय्य देण्यात आले आहे. पुणे शहर तसेच संपूर्ण भारतातील रुग्णालयांना लाइफ सेव्हिंग उपकरणे, सॅनिटायझर्स, मास्क, पीपीई सूट्स इ. त्याचप्रमाणे रुग्णांना प्रथिनयुक्त आहार मिळावा म्हणून वेंकीजच्या सहयोगातून एक लाख अंडी रुग्णालयांतील कॅन्टीनला पुरवण्यात येतात. निसर्ग आणि अम्फान वादळाने पीडित तसेच नुकतेच आसाम पुरातील २०,००० व्यक्तींनाही भरघोस मदत करण्यात आली. मुंबई ते पालघर जिल्ह्यातील सुमारे दीडशे बेरोजगार कुटुंबांना कृषी प्रशिक्षण आणि बियाणे पुरवण्यात आली.

सध्याच्या महामारीबरोबरच सीमेवरील लडाख प्रांताच्या गलवान खोऱ्यात वीस जवान धारातीर्थी पडले. मुकुल जाधव फाऊंडेशनद्वारे त्या कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांच्या जीवनावश्यक गरजा पूर्ण करण्यासाठी साहाय्य करण्यात आले. व्यवस्थापकीय विश्वस्त रितु प्रकाश छाब्रिया यांनी ही माहिती दिली.